डाक जीवन बीमा
Postal Life Insurance

# मुंबई उत्तर पश्चिम विभाग टपाल जीवन विमा विभागाकरिता थेट अभिकर्त्यांची नियुक्ती/एजंट नेमणे आहे

**पात्रता आणि अन्य मापदंड :**

१. **वयोमर्यादा** - कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ५० वर्षे.

२. **शैक्षणिक अर्हता** - मान्यताप्राप्त केंद्रीय/राज्य सरकारच्या बोर्ड/संस्थांमधून १० वी उत्तीर्ण.

३. **अनुभव** - आवेदनकर्त्याला विमा क्षेत्राबाबत तसेच विपणन क्षेत्रात कुशलता असणे आवश्यक.

४. **श्रेणी** - बेरोजगार/स्वयंरोजगार असलेली व्यक्ती, माजी जीवन विमा सल्लागार/कोणत्याही विमा कंपनीचे माजी अभिकर्ता, माजी सैनिक, अंगणवाडी कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, शाळेचे निवृत्त शिक्षक, स्वयंसहायता समूह पदाधिकारी, इत्यादी टपाल जीवन विमा थेट अभिकर्तासाठी आवेदन करू शकतात.

थेट मुलाखतीद्वारे निवड झालेली थेट अभिकर्त्याला आंतरिक/व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाईल. त्याला टपाल विभागाने वेळोवेळी ठरविलेले कमिशन/प्रोत्साहन भत्ता दिला जाईल. निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरता परवाना देण्याकरिता रु.५०/- आणि परवाना परीक्षेसाठी रु. ४००/- फी म्हणून जमा करावे लागतील. तसेच रु. ५०००/- मूल्याचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (एन.एस.सी.)/किसान विकास पत्र (के.व्ही.पी.) भारताचे राष्ट्रपतींच्या नावे तारण म्हणून ठेवावे लागेल.

इच्छुक उमेदवारांनी पुढील ठिकाणी थेट मुलाखतीस लेखी अर्ज व शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य संबंधित दस्तावेज सोबत उपस्थित राहावे.

| अ.क्र. | मुलाखतीचे ठिकाण | थेट मुलाखतीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ अधीक्षक डाकघर, उत्तर पश्चिम विभाग यांचे कार्यालय, टपाल जीवन विमा विभाग, दुसरा मजला, मुंबई उत्तर पश्चिम विभाग, समतानगर, कांदिवली पूर्व, मुंबई-४००१०१. | २०.०२.२०२६ | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० पर्यंत |

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

०२२-२८८५०४१४/९८९८०५५३४६

**वरिष्ठ अधीक्षक डाकघर**
**उत्तर पश्चिम विभाग**